महाराष्ट्र शासन
धर्मादाय आयुक्त, महाराष्ट्र राज्य,
मुंबई यांचे कार्यालय

धर्मादाय आयुक्त भवन,
३रा मजला, ८३, डॉ. ॲनी बेझंट रोड,
वरळी, मुंबई ४०० ०१८.
दूरध्वनी क्रमांक०२२- २४९३५४३४ २४९३५४९०
२४९३०४९९ २४९३५५१६
फॅक्स ०२२-२४९७६४२०
Email Id:- occsupport.mum-mh@gov.in

Dharmaday Ayukt Bhavan
3rd Floor, 83,Dr. Annie Besant
Rd,Worli, Mumbai - 400 018
Tel No.022- 24935434 24935490
24930499 24935516
Fax-022-24976420
Website :- charity.maharashtra.gov.in


O.w./nyay/ 4108 /2019 Date- 20 AUG 2019

प्रति,
सर्व, मा. धर्मादाय सह आयुक्त/
धर्मादाय उप आयुक्त/ सहाय्यक धर्मादाय आयुक्त

विषय:- कलम ४१ क अन्वये देण्यात येणा-या परवानगी बाबत जाहीर प्रगटन

महोदय,

उपरोक्त विषयी आपणांस सविनय कळविण्यात येते की, मा. धर्मादाय आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी कलम ४१ क अन्वये देण्यात येणा-या परवानगी बाबत दिलेले जाहीर प्रगटन या सोबत जोडण्यात आहे.

आदेशानुसार आपणांस विनंती करण्यात येते की, सदर जाहीर प्रगटन आपल्या अधिनस्त कार्यालयाचे नोटीस बोर्ड वर / दर्शनी भागात डकवावे तसेच संबंधीत जिल्हा माहिती व जनसंपर्क कार्यालया मार्फत सार्वजनिक प्रसिद्धी साठी देण्यात यावे. याच प्रमाणे असेही सुचीत करण्यात येते की, कलम ४१ क अन्वये प्राप्त होणारे अर्ज जास्तीत जास्त प्रमाणात ऑनलाइन सादर करणे बाबत आणि त्यांचा तात्काळ निपटारा करणे बाबत अधिकारी/ कर्मचारीयांना आपलेस्तरा वरून योग्य त्या सुचना देण्यात याव्यात व जनतेस योग्य ते मार्गदर्शन करावे.

आपला विश्वासू

20-8-2019

(भ. फ. व्यास)
धर्मादाय उप आयुक्त
महाराष्ट्र राज्य, मुंबई

**प्रत**:- वरील प्रमाणे २ जाहीर प्रगटन

# जाहीर प्रकटन

## (सार्वजनिक न्यासाव्यतिरिक्त गणेशोत्सव मंडळाबाबत)

सार्वजनिक न्यासाव्यतिरिक्त गणेशोत्सव साजरा करणाऱ्या सर्व मंडळांना माहितीस्तव कळविण्यात येते की, महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था अधिनियम, १९५० च्या कलम 41-C अन्वये सर्व मंडळांना विहीत नमुन्यात संकेतस्थळावर किंवा प्रत्यक्षरित्या संबधित सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालयात अर्ज करणे अनिवार्य आहे. सदरचा अर्ज सर्व मंडळांना charity.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर करता येईल. संकेतस्थळावर सादर केलेल्या अर्जाचा निपटारा महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था अधिनियमातील कलम 41-C उपकलम 2 अन्वये सात दिवसात करण्यात येईल. प्रत्यक्ष सादर केलेला अर्ज प्राप्त झाल्यानंतर १५ दिवसांचे आत निकाली काढण्यात येईल. सदर तरतुदीअंतर्गत देण्यात येणारे दाखले ६ महिन्यांकरीता वैध असतील. सदर कालावधीनंतर असे दाखले नुतनीकरण करण्यास ग्राह्य नसतील. सर्व गणेशोत्सव मंडळांना सदरचा दाखला प्राप्त झाल्यापासून त्या कालावधीनंतर २ महिन्यांच्या आत सदर कार्यालयात लेखा परीक्षण अहवाल सादर करणे व उर्वरित रक्कम जमा करणे अनिवार्य आहे. गणेशोत्सव मंडळाने वरील तरतुदीप्रमाणे परवानगी न घेतल्यास महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम 66-C प्रमाणे ३ महिन्यांपर्यंत कैद किंवा परवानगी प्राप्त करण्यापुर्वी गोळा केलेल्या एकूण वर्गणीच्या दीड पटपर्यंत दंडाची तरतुद केली आहे. तरी सर्व मंडळांना भविष्यात होणारा अनर्थ टाळणेकरीता वरील नमूद कायद्याच्या तरतुदींचे पालन करण्याची विनंती करण्यात येत आहे.

Sd/- 20/8/19

दिनांक : २०.०८.२०१९

(संजय ग.मेहरे)
धर्मादाय आयुक्त,
महाराष्ट्र राज्य, मुंबई

# जाहीर प्रकटन

## (पुरग्रस्तांसंबंधित)

महाराष्ट्रातील सांगली कोल्हापूर सातारा व इतर जिल्ह्यांमध्ये आलेल्या महापुरामुळे बाधित पूरग्रस्त यांचे मदतीकरिता वर्गणी गोळा करणेकामी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्थ अधिनियम १९५० चे कलम ४१ क अन्वये विहित नमुन्यात पूर्वसूचना/ अर्जधर्मादाय उप आयुक्त/ सहायक धर्मादाय आयुक्त यांना सादर करण्याची मुभा आहे. अशा मंडळांना /संस्थांनी धर्मादाय उप आयुक्त/ सहायक धर्मादाय आयुक्त यांनी चौकशी केल्यांनतरअटी/शर्थींना अधीन राहून दाखला देण्यात येईल. सदर नमूद कारणाकरिता गोळा केलेल्या वस्तू / रकमेची योग्य विल्हेवाट लावण्याकरिता व गरजूंना ती मदत मिळणेकरिता सर्व मंडळांनी त्या वस्तू व रकमेचे वितरण जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत अथवा त्यांनी नेमलेल्या अधिकाऱ्याच्या समन्वयाने किंवा निरीक्षणाखाली करणे योग्य होईल.

संबंधित मंडळांनी माहिती / पुर्वसुचना देताना खालील कागदपत्रांच्या प्रति दाखल करणे गरजेचे आहे.

१) सर्व सदस्यांच्या सहीचा ठराव असावा (हस्तलिखित) प्रत

२) पदाधिकाऱ्यांचे / सदस्यांचे ओळखपत्रांची प्रत सोबत जोडावी (फोटो आईडी ची प्रत ओळख पटण्याजोगी असावी) जसे की, आधार कार्ड, पॅन कार्ड, वाहन परवाना इ.

येणेप्रमाणे संबंधित मंडळांकडून सुचना प्राप्त झाल्यास त्यांना महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था अधिनियमातील कलम 41 क चे उपकलम 3 नुसार सुचना प्राप्त झालेपासून 15 दिवसांचे आत दाखला देण्यात येईल. परंतु या कार्यालयास मदत / रक्कम गोळा करण्यामध्ये काही फसवणूक वा अपव्यय झाला असे समजण्यास कारण असल्यास धर्मादाय उप आयुक्त व सहायक धर्मादाय आयुक्त त्यांना तशी मदत / रक्कम गोळा न करण्याचे आदेश देतील आणि हिशोबपत्रके सादर करुन उर्वरित रक्कम पी.टी.ए.फंडामध्ये जमा करण्याचे आदेशित करतील. करीता वरील माहिती सर्वसामान्यांना मदत करण्याकरीता पुढे आलेल्या व्यक्तींना माहितीस्तव जाहीर प्रकटन देण्यात येत आहे.

Sd/- 20-8-19

दिनांक : २०.०८.२०१९

(संजय ग.मेहरे)
धर्मादाय आयुक्त,
महाराष्ट्र राज्य, मुंबई.